आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

४ एप्रिल २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रासह तीन राज्यांमधल्या रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे १८ हजार ६५८ कोटी रुपये खर्चाच्या ४ प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- जगाच्या कल्याणासाठी बिमस्टेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, बिमस्टेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची घोषणा

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित

- प्रख्यात चित्रपट अभिनेता आणि दिग्दर्शक निर्माता मनोज कुमार यांचं निधन

- नांदेड जिल्ह्यात आलेगाव इथं ट्रॅक्टर विहिरीत कोसळून ७ महिलांचा मृत्यू

**आणि**

- ५७ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघानं पटकावलं विजेतेपद

**<><><><><>**

रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे १८ हजार ६५८ कोटी रुपये खर्चाच्या ४ प्रकल्पांना आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली. महाराष्ट्र, ओदिशा आणि छत्तीसगढ या तीन राज्यांमधल्या १५ जिल्ह्यांमधून बाराशे सत्तेचाळीस किलोमीटर लांबीचे हे रेल्वे मार्ग जाणार आहेत. महाराष्ट्रातल्या गोंदिया - बल्लारशाह रेल्वेमार्गाचं दुपदरीकरण, तसंच गडचिरोली आणि मध्य प्रदेशातल्या राजनंदगाव या आकांक्षित जिल्ह्यांमधे मिळून १९ नवीन रेल्वे स्थानकांची उभारणी, या कामांचा या प्रकल्पांमधे समावेश आहे. या प्रकल्पांमुळे इंधन तेलावरचा खर्च वाचणार असून

कार्बन विसर्जनाचं प्रमाणही कमी होईल. तसंच यातून ३७९ लाख दिवस रोजगार मिळेल असं वैष्णव यांनी सांगितलं.

पूर्णपणे केंद्रपुरस्कृत व्हायब्रंट व्हिलेजेस कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यालाही केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली.

<><><><><>

जगाच्या कल्याणासाठी बिमस्टेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज बँकॉक इथं सहाव्या बिमस्टेक संमेलनात बोलत होते. बिमस्टेक ही दक्षिण आणि आग्नेय आशियाई देशांची संघटना असून सदस्य देशांमधे सहकार्यासाठी २१ कलमी कार्यक्रम प्रधानमंत्र्यांनी प्रस्तावित केला.

बिमस्टेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची घोषणा करुन त्यांनी सांगितलं की त्याची व्यावसायिक बैठक दरवर्षी होईल. आपत्ती व्यवस्थापन, शाश्वत सागरी वाहतूक, पारंपरिक औषधं, तसंच कृषी संशोधन आणि प्रशिक्षण या विषयांवर बिमस्टेक उत्कृष्टता केंद्र भारतात स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. त्यात बिमस्टेक देशातल्या ३०० तरुणांना कौशल्य विकासाची संधी देण्यासाठी बोधी या नवीन कार्यक्रमाची घोषणाही मोदी यांनी केली. याअंतर्गत व्यावसायिक, विद्यार्थी, संशोधक, तसंच राजनयिकांना प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती दिली जाईल.

बांगलादेशाचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनुस यांच्याशी मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. दोन दिवसांच्या थायलंड दौऱ्यात प्रधानमंत्र्यांनी काल थायलंडच्या प्रधानमंत्री पेतोंगतार्न शिनावात्रा यांच्याशी उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर चर्चा केली. थायलंडचा दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री श्रीलंकेला रवाना झाले.

<><><><><>

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आज संस्थगित झालं. ३१ जानेवारी रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनात ११८ टक्के काम झालं. लोकसभेत १६, तर

राज्यसभेत १४ विधेयकं संमत झाली. या अधिवेशनात भरीव विधायक कामकाज झाल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत १४ तास तर राज्यसभेत १७ तास चर्चा झाली, चर्चेदरम्यान एकदाही व्यत्यय आला नाही, असं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितलं. हे विधेयक सरकारनं बळजबरीनं मंजूर करून घेतल्याचा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचा आरोप रिजिजू यांनी फेटाळून लावला. सभापती ओम बिर्ला यांनीही हे विधान दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.

<><><><><>

वक्फ (सुधारणा) विधेयक, २०२५ काल राज्यसभेतही मंजूर झालं. संसदेनं मुस्लिम वक्फ रद्द करणे विधेयक, २०२५ लाही मान्यता दिली आहे. मुस्लीम राष्ट्रीय मंचाचे इरफान अली पीरजादे यांनी यासंदर्भात प्रतिक्रीया दिली....

**होल्ड - बाईट....**

<><><><><>

पुण्यातल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीनं उपचार न मिळाल्यानं तनिषा भिसे या महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी पुण्याच्या धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिले. या समितीत उपसचिव, कक्ष अधिकारी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय यांचे प्रतिनिधी, मुंबईच्या सर जे. जे. रुग्णालय समूहाचे अधीक्षक हे सदस्य असतील. त्याचप्रमाणे या घटनेची तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. आरोग्य विभागानं तातडीनं, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

बरीच धर्मादाय रुग्णालयं सेवा देत नाही, त्यामुळे धर्मादाय रुग्णलयांमध्ये एक आरोग्यदूत नेमणार असल्याचं वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज नाशिक इथं वार्ताहरांना सांगितलं.

<><><><><>

हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोज कुमार यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मनोज कुमार यांचं आज सकाळी मुंबई इथल्या कोकिलाबेन अंबानी रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अकरा वाजता मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.

मनोज कुमार यांचं मूळ नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ मध्ये तत्कालीन वायव्य सिंध प्रांतातल्या एबटाबाद इथं झाला होता. वो कौन थी, शहीद, हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, क्रांती, पूरब और पश्चिम, उपकार हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. देशभक्त नायक म्हणून त्यांनी साकारलेल्या रुपेरी पडद्यावरच्या व्यक्तिरेखांमुळे भारतकुमार हे टोपणनाव मिळालं. भारतीय चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना फिल्मफेअर पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार आणि पद्मश्री सन्मानानं गौरवण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मनोज कुमार यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर अमिट छाप सोडली आहे. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी देशभक्तीपर चित्रपट बनवून भारतीय मूल्यांविषयी अभिमानाची भावना जागृत केली, असं राष्ट्रपतींनी शोकसंदेशात म्हटलं आहे. तर, मनोज कुमार यांनी आपल्या अभिनय आणि चित्रपट निर्मितीच्या माध्यमातून राष्ट्राभिमानाची भावना सदैव जागृत ठेवली, ही भावना पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहिल, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी देखील मनोज कुमार यांच्या निधनाविषयी शोक व्यक्त केला आहे. मनोज कुमार यांनी त्यांच्या चित्रपटांमधून देशभक्तीचं मूल्य रुजवलं. ते खरोखरच भारत कुमार या नावाप्रमाणे जगले, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही शोक व्यक्त केला आहे.

<><><><>

नांदेड तालुक्यात आलेगाव इथं आज सकाळी मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळल्यानं ७ महिलांचा मृत्यू झाला. वसमत तालुक्यातल्या गुंज येथून या मजुरांना भुईमूग निंदणीसाठी घेऊन गेलेल्या ट्रॅक्टरच्या चालकाचा ताबा सुटल्यानं ट्रॅक्टर ट्रॉलीसह ते विहिरीत कोसळले. जवळच काम करत असलेल्या शेतमजुरांनी विहिरीत पडलेल्या दोन महिला आणि एका पुरुष मजुराला बाहेर काढलं. त्यानंतर नांदेड जिल्हा प्रशासन, नांदेड महापालिका अग्निशमन दल यांनी बचाव कार्य केलं. पाच ते सहा तास हे बचाव कार्य चाललं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबियांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदतही त्यांनी जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><>

ओडिशातल्या पुरी इथं झालेल्या ५७ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघानं विजेतेपद पटकावलं, तर पुरुष संघाला

उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. अंतिम सामन्यात दिमाखदार खेळी करत आज महाराष्ट्राच्या महिला संघानं यजमान ओडिशावर २५-२१ असा विजय मिळवला. मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ १०-१० असे बरोबरीत होते. मात्र, दुसऱ्या डावात महाराष्ट्रानं अचूक डावपेच आणि दमदार बचाव करत सामना जिंकला. पुरुष गटातल्या अंतिम सामन्यात रेल्वेच्या संघानं गतविजेत्या महाराष्ट्रावर ३६-२८ असा विजय मिळवला.

<><><><>

आकाशवाणीच्या लोकप्रिय कार्यक्रम निर्मात्या सुषमा हिप्पळगावकर यांचं काल मुंबईत निधन झालं. त्या ७३ वर्षांच्या होत्या.  आकाशवाणी मुंबई केंद्रातून कार्यक्रम अधिकारी म्हणून त्यांनी २००६ मधे स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. नागपूर मध्ये लोकमत मधून त्यांनी पत्रकार म्हणून काही काळ काम केलं होतं.

आकाशवाणी मुंबई केंद्रात नभोनाट्य, वनिता मंडळ, साप्ताहिक स्वास्थ्य सेवा, आरोग्यम धनसंपदा, अशा विविध सदरांमधून त्यांनी सकस आणि दर्जेदार कार्यक्रम सादर केले आणि ते श्रोत्यांच्या पसंतीला उतरले. प्रसन्न आवाज आणि संवादातली आपुलकी, हे त्यांच्या सादरीकरणाचं वैशिष्ट्य होतं.

<><><><>

गेल्या चोवीस तासात मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी, तर  कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी गारांचा पाऊस पडला. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान लोहगाव इथं ३९ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट, आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त  केली आहे.

//<><><><><>//